21391-95

जा.क्र.उमा१/कोवि/वैमान्यता/१७
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
दिनांक- 20 SEP 2017

प्रति,

प्राचार्य/ मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त अनुदानित/विनाअनुदानित कनिष्ठ महाविदयालये/ उच्च माध्यमिक शाळा,
कोल्हापूर विभाग.

विषय- उच्च माध्य शाळा/ कनिष्ठ महाविदयालयाकडील कर्मचारी भरतीस नाहरकत प्रमाणपत्र प्रस्तावाबाबत

संदर्भ- १) शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१७/प्रक्र.९४/अर्थ३, दि.८/८/२०१७ व दिनांक ३०/६/२०१७
२) वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.३०/२०१६/आ.पु.कक्ष, दि २५/०५/२०१७
३) शासन निर्णय दिनांक ६/२/२०१२, २०/६/२०१४, दि. १९/७/२०१४, व दि. ४/६/२०१६
४) शासन निर्णय क्र. सीईटी-२०१५/प्र.क्र.१४९/टीएनटी-१, दि. २३/६/२०१७
५) मा. आयुक्त, शिक्षण यांचे पत्र क्र.उच्चमाध-२४१/नाहप्र/२०१७/४७०७,दि २९/८/२०१७

वरील संदर्भिय १ ते ४ चे शासन निर्णय व परिपत्रके अवलोकनी घ्यावीत. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. तसेच संदर्भ क्र. ५ चे सोबत जोडलेले परिपत्रक अवलोकनी घ्यावे.

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार अनुदानितकडील पूर्णवेळ पदभरती ही मा. आयुक्त शिक्षण यांचे अध्यक्षतेखालील समितीने नाहरकत प्रमाणपत्र दिले खेरीज करता येणार नाही. शासन निर्णय दि. ४/६/२०१६ नुसार मा. आयुक्त, शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करणेत आलेली आहे. सदर समितीच्या दि. २९/१२/२०१६ रोजीच्या बैठकीमधील सूचनेनुसार या कार्यालयाकडे प्राप्त असलेले उच्च माध्यमिक कडील पूर्णवेळ शिक्षक भरतीबाबतचे प्रस्ताव नाहरकत प्रमाणपत्र मिळणेसाठी सादर करणेत आलेले होते.

तथापि, संदर्भ क्र. १, २ व ४ च्या शासन निर्णय/परिपत्रकानुसार शासनाने पदभरतीस निर्बंध केलेले असल्यामुळे व यापुढे शाळांमधील पदभरती पवित्र संगणक प्रणालीच्या माध्यमातून करावयाची असल्याने उच्च माध्यमिक शाळांतील पदे भरण्यास परवानगी देणे योग्य ठरणार नाही असे संदर्भ क्र. ५ नुसार कळविणेत आलेले आहे. यामुळे संचालनालयास सादर करणेत आलेले उच्च माध्यमिक शाळांतील पदभरतीकरीता नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबतचे सर्व प्रस्ताव संदर्भ क्र. ५ नुसार परत करणेत आलेले आहेत. तसेच सदर प्रकरण तात्काळ प्रभावाने नस्तीबध्द करणेत आलेले आहे.

**उपरोक्त १ ते ५ मधील सर्व सूचना/आदेश विचारात घेता, या कार्यालयाकडे उच्च माध्यमिक कडील पदभरतीस नाहरकत प्रमाणपत्र मागणेसाठी सादर करणेत आलेले प्रस्ताव रदद करुन सदरचे नाहरकत प्रमाणपत्र प्रकरण नस्तीबध्द करणेत येत आहेत. सदरचे प्रस्ताव या कार्यालयाकडून तात्काळ परत घेवून जावेत.**

तसेच संस्था/शाळांनी त्यांचेस्तरावरुन शासनाचे/या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्राशिवाय पदभरती केलेली असल्यास सदरची पदभरती ही बेकायदेशीर असलेने अशा पदभरती केलेल्या प्रस्तावाना या कार्यालयाकडून मान्यता दिल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सदरच्या सूचना संस्थेच्या निदर्शनास आणणेत याव्यात.

(एम.के. गोंधळी)
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत माहितीसाठी सविनय सादर-

१) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ३२
२) मा. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे १
३) मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे १

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी-

शिक्षणाधिकारी (माध्यमिक/प्राथमिक) जिल्हा परिषद, कोल्हापूर विभाग.

Government of Maharashtra
Commissionerate of Education, Maharashtra State
Central Building, Dr.Annie Besant Road
Pune - 411 001

महाराष्ट्र शासन,
शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य
मध्यवती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग
पुणे ४११ ००१

क्र.उच्च माध्य-२४१/ना.ह.प्र/२०१७/४६०६.
दिनांक : २८/०८/२०१७

29 AUG 2017

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक, (सर्व) कोल्हापूर

**विषय- उच्च माध्यमिक शाळांतील कर्मचारी भरतीस नाहरकत प्रमाणपत्र प्रस्तावा बाबत**

**संदर्भ-** १.शासन शुद्धीपत्रक क्रमांकः एसएसएन-२०१४/(१/१४)/टीएनटी-२ दि.०४/०६/२०१६
२.शासन निर्णय क्रमांक.सीईटी-२०१५/प्रक्र.१४९/टीएनटी-१ दि.२३/०६/२०१७
३.वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्रक्र.३०/२०१६/आ.पु.कक्ष दि.२५/०५/२०१७
४.वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्रक्र.९४/अर्थ-३ दि.३०/०६/२०१७

संदर्भ क्र.१ नुसार उच्च माध्यमिक शाळांना पदभरतीस नाहरकत प्रमाणपत्र देणेसाठी आयुक्त, शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या दि.२९/१२/२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये, विनाअनुदानित पदे, अल्पसंख्याक शाळांतील पदे व अंशकालीक पदभरतीसाठी परवानगी देण्याची कार्यवाही विभागीय शिक्षण उपसंचालक स्तरावरुन करणेबाबत सूचित करणेत आलेले आहे. त्यानुसार अनुदानित उच्च माध्यमिक शाळांतील पूर्णवेळ पदे भरण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबतचे प्रस्ताव शिक्षण संचालनालयास सादर करण्यात आलेले होते.

तथापि, संदर्भ क्र.२ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांसह खाजगी व्यवस्थापनाच्या अनुदानित, अंशतः अनुदानित व अनुदानास पात्र घोषित केलेल्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षणसेवक भरती **अभियोग्यता चाचणीद्वारे**, गुणांच्या आधारावर (**पवित्र** संगणक प्रणालीद्वारे) करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच, यापुढील काळात शाळांमधील शिक्षक भरती अभियोग्यता चाचणीच्या माध्यमातून करणे बंधनकारक आहे.

संदर्भ क्र.३ नुसार जे प्रशासकीय विभाग आकृतिबंध अंतिम मंजूर करुन घेणार नाहीत, तोपर्यंत त्या विभागांना नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती करता येणार नाही.

संदर्भ क्र.४ नुसार क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी शासनाच्या मान्यतेशिवा कोणत्याही शिक्षक/ शिक्षकेतर पदांना मान्यता देऊ नये. शिक्षण संस्थांनी परस्पर शिक्षकांची भरती करु नये. असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

वरील तरतूदी लक्षात घेता शासनाने पदभरतीस निर्बध केलेले असल्यामुळे व यापुढे शाळांमधील पदभरती पवित्र संगणक प्रणालीच्या माध्यमातून करावयाची असल्यामुळे, उच्च माध्यमिक शाळांमधील पदे भरण्यास परवानगी देणे योग्य ठरणार नाही. सबब, संचालनालयास सादर करण्यात आलेले उच्च माध्यमिक शाळांतील पदभरतीकरीता नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबतचे सर्व प्रस्ताव याद्वारे परत करण्यात येत आहेत.

तरी आपणास सूचित करण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णयातील सर्व तरतूदी आपले अधीनस्थ सर्व अधिकारी, शाळा, संस्था यांच्या निदर्शनास आणाव्यात व त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. सोबत सर्व मूळ प्रस्ताव परत पाठविणेत येत आहेत. सदर प्रकरण या स्तरावर तात्काळ प्रभावाने नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

२९-०८-१७

आयुक्त, शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे

शिक्षण उपसंचालक कार्यालय
-: कोल्हापूर :-
आवक क्र. 1286 शाखा ...
दिनांक 16 SEP 2017
टे.अ. क.प्र. शि.उ.स

**प्रत, माहितीस्तव,**
मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई याना सविनय सादर.
शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.

16-9-17
15-9-17